# संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

## सन २०२६-२७, ई - निविदा सुचना क्र.०७

जा.क्र.बांध-१४/R /३९५/२०२६ दि - १५/०५/२०२६

संगमनेर नगरपरिषद क्षेत्रातील करावयाच्या खालील कामाच्या बी-१ ई-निविदा पद्धतीने योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन ऑनलाईन ई-निविदा मागविणेत येत आहेत. सविस्तर ई-निविदा शासनाच्या https//mahatenders.gov.in या संकेतस्तळावर पात्र व अनुभवी संस्थांकडून निविदा/प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. दि. १६/०५/२०२६ पासुन पहावयास उपलब्ध आहेत. कामाचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम रुपये | निविदा फॉर्म फी रुपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण रस्ता अनुदानातून संगमनेर नगरपरिषद हद्दीतील खड्डे पडलेल्या रस्त्यांवर पॅचवर्क (Patchwork) पद्धतीने दुरुस्ती करणे . | १,३९,९३,७७४/- | १,३९,९३८/- | २०,०००/- | २ महिने |

| ई-निविदा पद्धतीचा तपशिल | वेळ व दिनांक |
|---|---|
| ऑनलाईन निविदा डाऊनलोडिंग / बिड सबमिशन | दिनांक – १६/०५/२०२६ वेळ दु. १२.०० ते<br>दिनांक - २३/०५/२०२६ रोजी सायं.५.०० वा.पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक | दिनांक - १९/०५/२०२६ रोजी दुपारी. १२.०० वाजता मा.मुख्याधिकारी यांचे दालनासमोर. |
| बिड ओपनिंग ( शक्य झाल्यास) | दिनांक – २५/०५/२०२६ वेळ सकाळी १०.००वा. |

**(अटी व शर्ती) –**

१) सर्व पात्र / इच्छुक निविदा धारकांनी डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीचे https//mahatenders.gov.in या Portel वर Enroll करणे आवश्यक आहे.

२) वरिल कामाचे निविदा पत्र अटी व शर्ती https//mahatenders.gov.in या संकेतस्तळावर प्राप्त होईल तसेच दिनांक – १६/०५/२०२६ ते दिनांक – २३/०५/२०२६ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने त्यांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

३) ऑनलाइन निविदा उघडण्याचा कालावधी पूर्वी निविदा, टेंडर फी, EMD ची मूळप्रत व निविदा सोबत आवश्यक असलेली कागदपत्र प्रमाणित करून ती नगरपरिषद कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

४) सदर कामाच्या निविदा बाबत. अ) कामाचे निविदा पत्र डाऊनलोड केल्याची फी व १ % बयाणा रक्कम वरिल तक्त्याप्रमाणे मुख्याधिकारी,संगमनेर नगरपरिषद यांचे नावे नेटवर्कींगची स्कॅन केलेली प्रत अपलोड (Upload) करावी लागेल. ब) कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र (फोटोसहीत) ,प्राप्तीकर विवरणपत्र व यापुर्वी वरिल प्रकारच्या केलेल्या कामांचा अनुभव दाखला स्कॅन केलेली प्रत अपलोड (Upload) करावी लागेल फक्त सार्वजनिक बांधकामाचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल. क) ठेकेदाराकडे उक्त कामासाठी स्वत:कडे असलेल्या आवश्यकती आधुनिक मशिनरी,तांत्रिक कर्मचारी,कुशल कारागिर यांची यादी स्कॅन केलेली प्रत अपलोड (Upload) करावी लागेल.ड) शासकीय अधिकारी व नगरपरिषद सदस्यांचे समावेश नसल्याचे विहीत नमुण्यातील प्रमाणपत्र स्कॅन केलेली प्रत अपलोड (Upload) करावी लागेल.

५) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सी.ए.टी.२०१८/प्र.क्र.१२७/ इमा-२ दिनांक – २८ नोव्हेंबर २०१८ नुसार ई – निविदा सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याचे प्रमाणपत्र ५००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे ठेकेदारास **बंधनकारक** राहील.

६) तांत्रिक पात्र ठेकेदारांमधील सर्वात कमी दर देणारे ठेकेदाराचे कार्यारंभ आदेश मुळ कागदपत्राची तपासणी करणेसाठी मुळ कागदपत्र उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील व अशी तपासणी केल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

७) यशस्वी ठेकेदारास कामाचा आदेश निर्गमित करतेवेळी २ % सुरक्षा अनामत व ७ % चालु बिलातुन सुरक्षा अनामत भरावी लागेल.

८) निविदे सोबत अपलोड केलेल्या टेंडर डॉक्युमेंट मधील B-१ टेंडर फॉर्म मधील सर्व अटी व शर्ती निविदा धारकास बंधनकारक राहील.

९) कामाचे त्रयस्थ लेखापरिक्षण करणे बंधनकारक राहील.

१०) यशस्वी ठेकेदारास १% कामगार विमा व नियमानुसार इतर शासकीय (GST) कर भरणे बंधनकारक राहील.

११) निविदेसोबत कोणतेही मार्गदर्शक सुचना,शुद्धीपत्रक अथवा इतर माहीती https//mahatenders.gov.in या संकेतस्तळावर पहावयास मिळेल.

१२) ई.पी.एफ.कायद्याप्रमाणे कंत्राटदाराचे रजिस्ट्रेशन जोडणे आवश्यक आहे त्याशिवाय निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

१३) ठेकेदाराने एकदा भरलेली निविदा कोणत्याही परिस्थीतीत माघार घेता येणार नाही तसे झाल्यास सदर ठेकेदाराचे नाव काळ्या यादीत टाकुन भरलेली सुरक्षा अनामत जप्त करणेचे अधिकार नगरपरिषदेकडे राखीव आहेत.

१४) कंत्राटदार यांनी साईट पाहणी करून प्रत्यक्ष मोजणी करूनच निविदा भरावी अन्यथा अंदाजपत्रकाव्यतिरिक्त होणाऱ्या कामास निविदा धारक स्वत: जबाबदार राहील. अंदाजपत्रक व प्रत्यक्ष स्थळ पाहणी मोजणी मध्ये काही फरक आढळून येत असेल तर तसे नगरपरिषदेस अवगत करावे.

१५) कोणतीही निविदा मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवलेला आहे.

१६) संकेतस्थळावर काही तांत्रिक अडचणी आल्यास वरील वेळापत्रकात बदल संभवतात.

(दयानंद गोरे)
मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(डॉ. मैथिली सत्यजीत तांबे)
नगराध्यक्ष
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

Signature Not Verified
Digitally signed by PANKAJ SUNIL MUNGASE
Date: 2026.05.16 08:43:24 IST
Location: Maharashtra-MH